Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL
MULTIDISCItPLINARY
QUARTERLY RESEARCH
JOURNAL

# AJANTA

Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

VOLUME - VII, ISSUE - IV - October - December - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | सावित्रीबाई फुलेचे शैक्षणिक योगदान<br>**प्रा. डॉ. कैलास जे. गायकवाड** | १-५ |
| २ | सामाजिक परिवर्तनाच्या प्रणेत्या : सावित्रीबाई फुले !<br>**प्रा. निरंजन भा. ब्राम्हणे** | ६-८ |
| ३ | सावित्रीबाई फुले व सामाजिक परिवर्तन<br>**प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर** | ९-१२ |
| ४ | सावित्रीबाई फुले व सामाजिक परिवर्तन<br>**प्रा. रा. तु. आदे** | १३-१७ |
| ५ | सावित्रीबाई फुले आणि स्त्रिमुक्ती<br>**प्रा. डॉ. दिवाकर एन. कामडी** | १८-२१ |
| ६ | सावित्रीबाई फुलेंच्या भाषणांचा विश्लेषणात्मक अभ्यास<br>**प्रा. प्रीती किशोर उमाठे** | २२-२४ |
| ७ | सावित्रीबाई फुले : एक काव्य रचनाकार<br>**रायबोले अर्चना रामरतन** | २५-३१ |
| ८ | ज्ञानज्योति सावित्रीमाई फुले यांचे स्त्री, अनाथ व शोषीतांच्या शैक्षणिक व आर्थिक विकासामधील योगदान<br>**डॉ. देवराव सु. मनवर** | ३२-३७ |
| ९ | विधवा पुनर्विवाह व मानसिक बदल<br>**सहा. प्रा. डॉ. राहुल जी. गोंडाणे** | ३८-४१ |
| १० | स्त्रीमुक्ती चळवळीच्या प्रणेत्या : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले<br>**प्रा. डॉ. राजेंद्र यादवराव बारसागडे** | ४२-४६ |
| ११ | आधुनिक मराठी काव्याची जननी व अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या धनी : सावित्रीबाई फुले<br>**प्रा. अरविंद बा. पाटील** | ४७-५१ |
| १२ | स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्त्या<br>**डॉ. एस. के. खंगार** | ५२-५५ |
| १३ | फुले काळ व कवि रचनाकार<br>**डॉ. अंजली आनंद चौरे** | ५६-५८ |


Adarsh Arts & Commerce College Desaiganj ★

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
**AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5** (www.sjifactor.com)

# ५. सावित्रीबाई फुले आणि स्त्रिमुक्ती

**प्रा. डॉ. दिवाकर एन. कामडी**
सहाय्यक प्राध्यापक, आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय, देसाईगंज (वडसा), जि. गडचिरोली.

## प्रस्तावना

भारतातील पहिल्या शिक्षिका, स्त्रीमुक्ती चळवळीच्या पहिल्या प्रणेत्या, पददलीतांच्या कैवारी आणि प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्त्या म्हणून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्थान अढळ आहे. एका अशिक्षीत स्त्रीने शिक्षण घेऊन शिक्षीका बनावे आणि वर्षानुवर्ष अज्ञानाच्या अंधकारात चाचपडणाऱ्या स्त्री–पुरुषांना ज्ञानाचा प्रकाश दाखववावा ही गोष्ट भारताच्या दोन हजार वर्षाच्या इतिहासात अभुतपुर्व अशी आहे. मणुष्यत्वासाठी शिक्षण हा मुलभूत विचार सव्वाशे वर्षापूर्वी मांडणाऱ्या सावित्रीबाई फुले हया भारतातील थोर शिक्षणतज्ञ होत. लोकांना माणूस बनवीणे, ताठमानेने उभे राहायला लोकांना शिकविणे, सत्व जपण्यास शिकविणे आणि त्याहीपलीकडे माणसांबद्दल प्रेम निर्माण करण्यास शिकविणे एवढा शिक्षणविषयक व्यापक दृष्टीकोण हा लोकोत्तर स्त्रीच्या ठिकाणी होता.

स्त्री शिक्षणाच्या क्षेत्राततून सामाजिक क्षेत्रात पदार्पण करावे, दुष्काळात अन्नान करून तडफणाऱ्या हजारो जीवांच्या मुखांत घास भरवावा, शेतकरी सामाजिक सुधारणांसाठी वाङमयाचे साधन हाती घेऊन कवियीत्री आणि लेखिका बनावे. सर्व गाव समाज सुशिक्षीत संस्कृत करण्याचे, जनावराप्रमाणे जीणे जगणाऱ्या स्त्री–पुरूषांना माणसात आणण्याचे वेड घ्यावे, पतीच्या निधनानंतरही शोक करीत न बसता सत्यशोधक समाजाच्या तत्वप्रसाराचे कार्य करण्याचे सतीचे वाण घेऊन अविश्रांत काम करावे. दीनदलीतांसाठी, दीनदलीतांच्या मुलांसाठी, रोगांच्या साथीत दिवसा–रात्री घराबाहेर पडावे, त्यांची सेवा करावी, प्लेगच्या साथीत त्यांना कडेवर घेऊन आपल्या दत्तक मुलाच्या दवाखान्यात घेऊन जावे, तेथे प्लेगच्या रोगाला आपण बळी पडत असल्याची जाणीव होऊनही रूग्णांची सेवा करीत राहावी आणि ही सेवा करता करता अनंतात विलीन होऊन जावे अशा या व्यक्तिमत्वांस केवळ अलौकिक हे एकच विशेषण योजता येईल.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्म 3 जानेवारी 1831 साली सातारा जिल्हयातील खंडाळा तालुक्यातील नायगांव येथे झाला. त्याकाळी बालविवाहाची प्रथा असल्यामुळे वयाच्या ९ व्या वर्षी जोतीरावाबरोबर 1841 साली विवाह झाला. तेव्हा जोतीरावाचे वय 14 वर्षे होते. जोतीरावाच्या प्रेरणेने त्यांच्या शिक्षणाला सुरूवात झाली. 1847 मध्ये नार्मलस्कुलची परीक्षा पास केली. जोतीरावांचा पींड मुलतः क्रांतीकारकांचा असल्यामुळे सावित्रीबाईची व्यक्तिरेखा जोतीरावांच्या विचारांचा प्रतिध्वनी म्हणून रेखाटल्या गेलेली दिसते. त्यातल्या त्यात ती एकमेकांच्या ध्येयधोरणाला परस्पर पूरक होती. सावित्रीबाई प्रारंभी अशिक्षीत जरूर होत्या, पण जेव्हा जोतिबांनी त्यांना शिकविले व शिक्षिका केले त्यावेळी त्यांचे वय जेमतेम 17 वर्षाचे होते. मानसशास्त्र सांगते की, हे ध्येयवेडे वय असते. या वयात जर एखाद्या ध्येयाला वाहून घेण्याची प्रेरणा झाली, तर त्या ध्येयाप्राप्तीसाठी आयुष्यभर प्रामाणिक राहून वाटेत येणारी सर्व संकटे पेलण्याची मानसिक तयारी आपोआप निर्माण होते. 17 वर्षाची सावित्रीबाई आणि 21 वर्षाचे



Adarsh Arts & Commerce College (Desaiganj)
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

जोतिबा यांनी स्वतःला समाजाच्या उध्दाराराठी वाहून नेण्याचा संकल्प केला. जगाच्या इतिहासात अशी अलौकिक व्यक्तिमत्वे दुर्मिळ आढळतात. जोतीराव व सावित्रीबाई हे महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारतीय सांस्कृतिक इतिहासात आपल्या अपूर्व कर्तृत्वाने वैशिष्टपूर्ण उमटून दिसावे असे अनन्यसाधारण रत्न आहेत.

**स्त्री शिक्षण**

भारतात ब्रिटिशांची राजवट सुरू झाली. त्याकाळी पुण्यात लॉर्ड डलहौसीची कारकिर्द होती. क्षूद्रादिक्षूद्र वर्ग व स्त्रिया यांचे हे अज्ञान समुळ नष्ट करण्यासाठी जोतीरावांनी 1 जानेवारी 1848 साली पुणे येथे बुधवारपेठेत भिडे यांच्या दुमजली वाडयात मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरू केली. ती भारताच्या सांस्कृतिक जीवनातील पहिली मुलींची शाळा होय. यापुर्वी मुलींची शाळा सुरू करण्याचा असा प्रयत्न कलकत्ता, मुंबई व पुणे येथे मिशनरी लोकांनी करून पाहिलेला होता. पण त्या शाळांना यश आले नाही. फुले दापंत्याची कार्यपध्दती अस्पृश्यांच्या मुलांना शिक्षण, स्त्रीशिक्षण, प्रौढशिक्षण, विधवाविवाह व दुष्काळात सर्वाना सहाय्य करणे ही होती. म्हणूनच फुले दांपत्यांने काढलेल्या 1848 च्या मुलीच्या शाळेला जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. या शाळेत सावित्रीबाई शिक्षिकेचे कार्य करू लागल्या व पुढे मुख्याधापिका झाल्यात. भारतातील प्रथम मुख्याधापिका म्हणून आज त्यांनी नोंद करावी लागते. सावित्रीबाईनी 1 जानेवारी 1848 रोजी सुरू केलेल्या मुलींच्या शाळेत अन्नपूर्णा जोशी, सुमती मोकाशी, दुर्गा देशमुख, माधवी थत्ते, सोनू पवार आणि जानी करडिले पहिल्या सहा विद्यार्थिनी दाखल झाल्यात. या सहा मुलींपैकी चार ब्राम्हण, एक धनगर आणि एक मराठा अशी वर्गवारी होती.

याच काळात फुले दांपत्यांने भिडेवाडा, महारवाडा, हडपसर, ओतूर, सासवड, आल्हाट घर, नायगांव, शिरवळ, तळेगांव, शिरूर, अंजीरवाडी माजगांव, करंजे, भिंगार, मुडवे, चिपळूणवाडा, नानापेठ, रास्तापेठ व वेताळपेठ इत्यादी पुणे परिसरात 18 शाळा उघडल्या. सावित्रीबाई फुलेंनी स्त्रीशिक्षणाचे कार्य अविरत सुरू ठेवले. फुले दांपत्याचे हे अभूतपूर्व कार्य पाहून 12 फेब्रूवारी 1853 रोजी मेजर कॅंडी यांनी विश्रामबागवाडयाच्या चौकात शाल व श्रीफळ देऊन जोतीराव व सावित्रीबाईचा जाहीर सत्कार केला. या समारंभाला विश्रामबागवाडयाच्या चौकात दोन हजार मंडळी उपस्थित होती. पुण्याच्या शैक्षणिक व सांस्कृतिक जीवनातील तो अभूतपूर्व प्रसंग होता. 1855 साली शेतकरी व मजूर स्त्रीपुरूषासाठी रात्रीच्या शाळा व प्रौढशिक्षणाची सुरूवात फुलेवाडयात झाली. 1864 साली त्यांनी अनाथ बालकाश्रमाची स्थापना केली. 1890 मध्ये जोतीबांचे निधन झाल्यावर जोतीबांचे स्त्री व क्षूद्राच्या उद्धाराचे कार्य सावित्रीबाईनी पुढे सुरूच ठेवले. हे कार्य चालवितांना त्यांना अतोनात श्रम, हालअपेष्ठा भोगाव्या लागल्या. उच्चवर्णियांकडून अर्वाच्च शिव्या व शेणमातीचा मार सहन करावा लागला. मुलींना व अस्पृश्यांना शिकविण्यासाठी कोणीही शिक्षक पुढे येत नव्हते तेव्हा स्वतः सावित्रीबाई शिकून शिक्षिका बनल्या. अशा रितीने सावित्रीबाई भारतातील पहिल्या शिक्षिका व मुख्याधापीका ठरल्या.

**अनिष्ठ रूढी–प्रथांचा विरोध**

पुरूषप्रधान व्यवस्थेने वर्णव्यवस्थेत स्त्रीचे जीवन यातनाघर करून ठेवले होते. त्याकाळी स्त्री ही गुलाम समल्या जात होती. बालविवाह, सती जाण्याची पध्दती, देवदासी प्रथा, विधवांचा केशवपण पध्दती, विधवा विवाहास बंदी, अस्पृश्यता इत्यादी रूढींचा गळफास स्त्रीजीवनाभोवती होता. उत्तर पेषवाईच्या काळात मनुस्मृतीचे पारंपारिक संस्कार समाज मनावर होते. स्त्रिया शिकल्या तर 42 पिढया नरकात जातात अशी समाजाची भोळी समजूत होती.



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa), Dist.- Gadchiroli

कर्मकांड व व्रतवैकल्य या दोन गोष्टीत समाज गुंतून पडला होता. त्याकाळी सतीप्रथा, केशवपण इत्यादीसारख्या क्रूर पध्दती होत्या. जोतीरावांनी व सावित्रीबाईनी या पाशवी रूढीला विरोध करून नापितांचे ह्रदयपरिवर्तन घडवून आणले.

**बालहत्या प्रतिबंधक गृह**

विधवा पुनर्विवाह भारतात आजदेखील एक समस्या आहे. त्याकाळी कल्पना करून पहा काय भयंकर परिस्थिती असेल. खरेतर विधवा पुनर्विवाहाला जबाबदार स्वतः स्त्री मानसिकता आहे. पुरूष विधवेशी विवाह करायला तयार होईल परंतु प्रामाणिकपणे स्वतःला प्रश्न विचारून पहा, किती सासू विधवेला आपली सून बनविण्यासाठी तयार होतील? किती नणंदा विधवेला आपली भावजय बनवायला राजी होतील? म्हणून विधवा पुनर्विवाह घडवायचा असेल तर पुरूषी नव्हे तर स्त्री मानसिकता बदलण्याची गरज आहे. अशा विधवांना अनैतिक संबंधातून राहिलेले अपत्य जन्मास घालण्यासाठी बालहत्या प्रतिबंधक गृह सावित्रीबाईनी चालविले. स्थापना जोतिबांनी केली परंतु ते चालविण्याचे काम तर सावित्रीबाईचेच. एक स्त्री म्हणून त्यांनी केलेले हे काम खरेच अविश्वनीय आहे. एक स्त्री असून देखील परस्त्रीला आपल्या घरात राहण्याची परवानगी देणारी, त्यांची सेवा सुश्रुषा करणारी, त्यांच्या अपत्यांना जन्म देण्यास सर्व सुविधा पुरविणारी ही बाई खरेच आकलनाच्या पलीकडची आहे, हीच सावित्रीबाईची थोरवी!

त्या काळात रूढी व परंपरांचे अंध संस्कारच कायम राहिले होते. रूपसुंदर व तरूण विधवावर पाशवी बलात्कार कुटुंबात व कुटुंबाबाहेर होत असत व त्यातून त्यांना गर्भधारणा होई तेव्हा आत्महत्या करण्याशिवाय गत्यंतर उरत नव्हते. ही अडचण ओळखून सावित्रीबाईनी 1853 साली काशीताई नावांची तरूण विधवा आत्महत्या करायला निघाली होती, तिला या बालहत्या प्रतिबंधक गृहात आणून सावित्रीबाईनी तिचे बाळंतपण केले व आपल्या हाताने यशवंतरावांची नाळ कापली. यशवंतरावावर स्वतःच्या मुलापेक्षाही काकणभर जास्त प्रेम केले. ग्यानोबा कृष्णाजी ससाणे यांची मुलगी लक्ष्मी मागून यशवंतरावाचा विवाह लावून दिला. 4 फेब्रूवारी 1889 साली झालेला हा विवाह महाराष्ट्रातील पहिला मिश्रविवाह होय.

**प्लेग आणि सावित्रीबाई**

फेब्रूवारी–मार्च 1897 च्या प्लेगच्या भयंकर साथीत रूग्णांना मदत करण्यासाठी जीव धोक्यात घालून त्यांनी औषधोपचार केले. पांडुरंग बाबाजी गायकवाड या मुढव्याच्या महार समाजातील मुलाला पाठीवर घालून त्या हडपसरला ससाणे मळयात डॉक्टर यशवंतरावाच्या दवाखाण्यात घेऊन गेल्या आणि ते औषधोपचाराने बरे झाले. पण स्वतः याच संसर्गजन्य आजारात 10 मार्च 1897 रोजी अनंतात विलीन झाल्या.

**सारांश**

सावित्रीबाई फुलेंचे व्यक्तित्व हे सामान्य नव्हते. एका समाजसुधारकाची पत्नी म्हणून त्यांचे एक संवंग अस्तित्व होते असे म्हणता येणार नाही. सावित्रीबाईनी जोतीरावांना त्यांच्या इहलोकातील आयुष्याच्या अखेरच्या प्रवासापर्यंत साथ केली होती. जोतीरावांच्या उतुंग व्यक्तिमत्वाच्या वटवृक्षाखाली सावित्रीबाईची प्रतिमा अस्पष्ट दिसणे हे स्वाभाविक असले किंवा त्यांचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कार्य अद्‌भूत व अशक्य कोटीतील वाटले तरी ते एक वास्तव आहे. मुलीसाठी व महारमांगासाठी शाळा काढणे, वाट चुकलेल्या स्त्रियांच्या पोटी जन्मलेल्या अर्भकांसाठी बालहत्या प्रतिबंधक गृह काढणे, गोरगरीब मजुरांसाठी रात्र शाळा काढणे, दुष्काळात अन्नान करणाऱ्या गरीबांच्या



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

दुःखात अन्नछत्र उघडून घास भरवीणे, केशवपण, विधवाविवाहबंदी, देवदासी पद्धती, दारूडेपणा इ. दृष्ट प्रथांचे उच्चाटन करणे ही गोष्ट सोपी नाही. त्यांचे व्यक्तिमत्व बहुआयामी होते. 19 व्या शतकातील तो एक चमत्कार होता.

**संदर्भ**


1. सावित्रीबाई फुले समग्र वाङमय, संपादक डॉ. मा. गो. माळी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृष्ठ क. 10, 13, 14
2. महात्मा ज्योतीराव फुले– पूर्वसूरी आणि प्रभावळ, लेखक – प्रा. कृष्णा चौधरी, – ऋचा प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क. 44, 45, 51
3. आधुनिक भारत 1818– 1975, लेखक डॉ. सोमनाथ रोडे, पिंपळापूरे ॲन्ड पब्लीशर्स , नागपूर, पृ. क.99.
4. आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास, लेखक – डॉ. जयसिंगराव पवार, सौ. वसुधा पवार, विद्या प्रकाशन नागपूर, पृ. 258
5. महात्मा ज्योतीराव फुले व्यक्तित्व आणि विचार, ग. बा. सरदार, पृष्ठ क. 97.
6. महात्मा ज्यातीराव फुले, लेखक– धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
7. स्त्रीयांची परवशता, लेखक– जॉर्ज स्टुअर्ट मिल ( मराठी भाषांतर गो. वा. कानिटकर, बाबाजी सखाराम आणि कंपनी, मुंबई.)


Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa), Dist.- Gadchiroli